## <u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>

(पारित दिनांक १८/०३/२०२६)

प्रस्तुत अर्ज कलम ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जास कुणाचे आक्षेप आहे किंवा काय हे तपासुन पाहण्याकरीता दिनांक ०३/०२/२०२६ रोजी, दैनिक वृत्तपत्र 'नवराष्ट्र' मध्ये जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदर वृत्तपत्र दस्तऐवज यादी **(नि.क्र.०९)** सोबत जोडले आहे व नियमानुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेले असून त्यांचे अहवाल **(नि.क्र.७)** प्रमाणे जोडलेले आहेत. जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून विहित मुदतीत अर्जास कोणीही आक्षेप घेतला नाही.

३. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१ हिमाताई सोमकांत बुध्दे यांना **नि.क्र.१०** प्रमाणे तपासले आहे. मयत सोमकांत सुदाम बुध्दे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, सरपंच ग्रामपंचायत, विसोरा यांचे वारसान प्रमाणपत्र, मृतकाची आई बकुबाई सुदाम बुध्दे यांचे मृत्यु प्रमाणपत्र व अर्जदारांच्या आधार कार्डांच्या सत्यप्रती दस्तऐवज यादी (**नि.क्र.०४)** सोबत दाखल केलेल्या आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे अपत्ये आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत सोमकांत सुदाम बुध्दे यांचे वारस आहेत. मयत सोमकांत सुदाम बुध्दे हे दिनांक २५/१२/२०२५ ला मरण पावले. अर्जात नमूद व्यक्तींच्या व्यतिरिक्त मयत सोमकांत सुदाम बुध्दे यांना कोणीही वारस नाही.

अर्जदारांनी वारस म्हणून, खाजगी व शासकीय योजनेचा लाभ मिळावा म्हणून, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्ज दाखल केला आहे.

४. न्यायालयासमक्ष दाखल केलेल्या तोंडी व लेखी साक्षपुराव्यावरून, अर्जदार हे मयत सोमकांत सुदाम बुध्दे याचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. करीता पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येते.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत सोमकांत सुदाम बुध्दे यांचे वारस असल्याबाबत, अपेडिक्स–बी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये औपचारीक दाखला देण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.18 17:47:03 +0530

दिनांकः १८/०३/२०२६.

**(सतिश गोपालराव गोरे )**
**दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), देसाईगंज.**
**JO CODE- MH02902**